दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२४ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ९ वा ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 24 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 9 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

## राष्ट्रीय व राज्य महिला आयोगाच्या वतीने ‘शक्ती संवाद’

# महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)**-विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून, यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय ‘शक्ती संवाद’ कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून, दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन - मंथन होणार आहे. या महत्वपूर्ण चर्चेचा सकारात्मक विचार करून धोरणात्मक निर्णय घेतले जातील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

विकसित अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्वाची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहेत. महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिले नसून आर्थिक परिवर्तनाच्या उपक्रमासाठी आवश्यक आहेत.मुलींच्या सबलीकरण व संरक्षणासाठी सुरू केलेल्या ‘बेटी बचाव - बेटी पढाओ’ योजनेपासून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी ‘लखपती दीदी’ पर्यंतच्या योजना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत. एक करोड महिलांना ‘लखपती दीदी’ बनवणार असल्याचा विश्वास यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर म्हणाल्या की, राज्यातील महिला तस्करी संपूर्ण नष्ट करण्याच्या दृष्टीने राज्य महिला आयोग काम करीत आहे. आतापर्यंत विविध देशातून अनेक महिलांची सुटका करण्यात आली आहे. महिलांची सुरक्षा ही आमची जबाबदारी असल्याने




गुन्हेगारांना आणि गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आवडे, यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, भारतीय राज्यघटनेने महिलांच्या सन्मान व हक्कांच्या रक्षणासाठी केलेल्या विशेष तरतुदीनुसार राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांची सामाजिक स्थिती उंचावणे, हक्कांचे रक्षण करणे व अन्यायाविरुद्ध न्याय मिळवून देणे हा याचा उद्देश आहे. महिला आयोग आपल्या दारी, बालविवाह व विधवा प्रथांना आळा बसण्यासाठी अभियान राबविण्यात येते. महिलांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाइन-१५५२०९ सुरू करण्यात आली आहे. मिशन ई-सुरक्षा, सखी वन-स्टॉप सेंटर, भरोसा सेल्स व प्रशिक्षण शिबिरे हे महत्त्वाचे उपक्रम आहेत. राष्ट्रीय स्तरावर पंचायत से संसद २.०, सायबर सुरक्षेसाठी डिजिटल शक्ती, हरियाणाची मोरी लाडो रेडिओ कार्यक्रम, दृष्टीहीन महिलांसाठी सवेरा, निमिया रोखण्यासाठी मिशन उत्कर्ष, इशान्य भारतात महिलांना उद्योगासाठी स्वावलंबिनी आणि खाद्यपदार्थ व्यवसायासाठी महाराष्ट्राचे फराळ सखी हे उपक्रम उल्लेखनीय आहेत. पश्चिम बंगालचे अपराजिता विधेयक व विविध राज्यांतील अभिनव उपक्रम राष्ट्रीय महिला आयोगांची भूमिका अधिक प्रभावी करतात. या कार्यक्रमाद्वारे पुढे येणाऱ्या नवविचारांचा महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

# संस्थाचालकांच्या जाचाला कंटाळून युवकाची आत्महत्या

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील नंदागौळ येथील रहिवासी असलेल्या एका २५ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली असून अनुकंपा तत्त्वावर सेवेत असणाऱ्या या तरुणाला पूर्वी कार्यरत असणाऱ्या शैक्षणिक संस्थेत आर्थिक कारणास्तव त्रास दिला जात असल्याने टोकाचे पाऊल उचलून जीवनाचा अंत केल्याची तक्रार पालकांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दिल्याने संस्था चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, परळी तालुक्यातील नंदागौळ येथील रहिवासी श्रीनाथ गोविंद गिते (वय २५) याने त्याच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तो सध्या आश्रम शाळा वसंत नगर येथील प्राथमिक शाळेत अनुकंपा तत्त्वावर कामाठी (सेवक) म्हणून एक महिन्यापूर्वीच सेवेत रुजू झाला होता. यापूर्वी तो केज येथील एका निवासी शाळेत चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून काम करीत परंतु त्या ठिकाणी बारा वर्षे झाले



तरी त्याला संस्थाचालकांनी कायमस्वरुपी करुन घेतले नव्हते. नामांकित असलेल्या केज येथील सानेगुरुजी निवासी विद्यालयाचे संस्थाचालक उद्धव माणिक कराड व परळी तालुक्यातील प्राथमिक आश्रम शाळा वसंतनगर तांडा चे संस्थाचालक संजय परशुराम राठोड यांनी मयत श्रीनाथ यांस शिक्षण संस्थेत पैसे न भरता अनुकंपा तत्वावर नौकरी करु न देण्याच्या उद्देशाने त्यास मानसिक त्रास देऊन वारंवार अपमानित केल्यामुळे श्रीनाथ गोविंद गित्ते यांनी आर्थिक आणि मानसिक संकट सहन न झाल्याने आपल्या नंदागौळ येथील राहत्या घरी शुक्रवार दि २२ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. मयत युवकाची फिर्यादी आई ही देखील दुर्धर आजाराने पीडित असून वडील हे केज येथील शैक्षणिक संस्थेत कार्यरत असताना सेवाकाळात मयत झालेले आहेत.मयत युवक हा परळी तालुक्यातील वसंत नगर येथील प्राथमिक आश्रम शाळेत सेवक म्हणून लागला होता. काल त्याने नंदाघोळ येथे आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली . दरम्यान या घटनेप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरन-३६९/२०२५ कलम-१०८.३५१(२),३५२,३(५) भा. न्याय संहितानुसार मयताची आई सुनिता गोविंद गित्ते यांच्या फिर्यादीवरून उध्दव माणिक कराड संस्थाचालक सानेगुरुजी निवासी विद्यालय केज व संजय परशुराम राठोड संस्थाचालक प्राथमिक आश्रम शाळा वंसत नगर तांडा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचें पोउपनि निमोणे हे करत आहेत.

## महावितरण विद्युत सहाय्यक भरती न्यायालयीन कक्षेत

# औरंगाबाद खंडपीठाने महावितरणला चार आठवड्यांत उत्तर देण्याचे आदेश

**छ.संभाजी नगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) मध्ये विद्युत सहाय्यक (५३८६ जागा) भरती प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदवले गेले असून, या भरतीविरोधात औरंगाबाद येथील उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाची प्राथमिक सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने महावितरणला चार आठवड्यांच्या आत सविस्तर उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. याचिकाकर्त्यांचे मुख्य आक्षेप शिकाऊ उमेदवारांची कट-ऑफ जनरल उमेदवारांपेक्षा अधिक ठेवण्यात आली असून, ही पद्धत अन्यायकारक असल्याचा आरोप. निवड यादीत कोणत्याही उमेदवारांचे गुण स्पष्ट दाखवलेले नाहीत, ज्यामुळे पारदर्शकता राहिलेली नाही बाह्यस्रोत (कॉन्ट्रॅक्ट) कर्मचारी यांचे गुणसुद्धा लपवण्यात आले




आहेत निवडयादी मध्ये एकाच उमेदवाराची दोन वेळा नावे अली आहेत भरती प्रक्रियेत नियमबाह्य पद्धतीने वर्तन झाले असून, उमेदवारांचा विश्वासघात झाल्याची तक्रार उमेदवारांची मागणी सर्व उमेदवारांचे गुण जाहीर करावेत. कट-ऑफ न्याय्य व समान पद्धतीने ठरवावी भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि अन्याय झालेल्या उमेदवारांना न्याय द्यावा न्यायालयीन आदेश प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयाने महावितरणकडून स्पष्टीकरण मागवले असून, चार आठवड्यांच्या आत सविस्तर उत्तर सादर करण्यास सांगितले आहे. या न्यायालयीन कारवाईमुळे हजारो उमेदवारांची नजर आता महावितरणच्या उत्तराकडे लागली आहे.ॲड.अमोल चाळक याचिका करता बबलू जोगदंड व सर्व शिंकाऊ उमेदवार.

## मनसेचे मुंबईतील खड्ड्यांविरोधात आंदोलन

# त्यांच्याकडे कोणतेही काम राहिलेले नाही-मंगलप्रभात लोढांची टीका

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पावसामुळे रस्त्यांची मोठी दुर्दशा झाली आहे. एका बाजूला खड्ड्यांमुळे टोल आकारला जाऊ शकत नाही, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले आहे. तर दुसरीकडे, या मुद्द्यावर आंदोलन करणाऱ्यांना उद्देशून मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी 'त्यांच्याकडे कोणतेही काम राहिलेले नाही' असे वक्तव्य केले आहे. मुंबई महानगरपालिकेने रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरू केले असून गणपतीपूर्वी हे काम पूर्ण होईल, असे आश्वासनही लोढा यांनी दिले आहे.मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जे लोक खड्ड्यांवरून आंदोलन करतात. त्यांच्याकडे कोणतही काम राहिलेले नाही. मग करायचे काय म्हणून ते आंदोलन करत आहेत. जिथे पॅचवर्क निघाले असेल तिथे देखील दुरुस्ती केली जाईल. गणपतीपूर्वी सगळे खड्डे बुजवले जातील, असे लोढा यांनी म्हटले आहे.

मुंबईतील रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात मनसे पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. आज, मनसेने चांदिवली येथील एनएसएस रोडवर खड्ड्यांमध्ये उभे राहून आंदोलन केले. यावेळी, खड्ड्यांमुळे जखमी झालेल्या नागरिकांचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करण्यासाठी काही जखमी कार्यकर्त्यांना खड्ड्यात उभे करण्यात आले होते. मनसे कार्यकर्त्यांनी पालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मनसेचे विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांनी यापुढे जिथे जिथे खड्डे असतील, तिथे तिथे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.मनसे प्रमुख राज ठाकरे रस्त्यांच्या दुर्दशेवर टीका करताना म्हणाले, रस्ते बांधकामाचे टेंडर काढा, रस्ता बनवा, तो खराब झाला की पुन्हा टेंडर काढा, हा नवा धंदा सुरू झाला आहे. शिवतीर्थवर गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी रस्त्यांवरून जोरदार टीका केली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत मुंबई शहर नियोजनाचा लघुआराखडा सादर करत चर्चा केली. गेल्या काही महिन्यांपासून ते मुख्यमंत्र्यांशी शहर नियोजनासह विविध विषयांवर संवाद साधत आहेत. मुसळधार पावसामुळे पाणी साचणे, रस्त्यांवरील खड्डे, वाहतुकीतील अडचणी, अनधिकृत पार्किंग यांसारखे गंभीर मुद्दे असले तरी, या भेटीत वाहतुकीसंदर्भात विशेष चर्चा झाली. प्रेझेंटेशनवेळी वाहतुकीसंदर्भातील पोलिस आयुक्तही उपस्थित होते.

# योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्ज माफी करू-उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्य सरकारच्या वतीने वेगवेगळ्या पद्धतीने शेतकऱ्यांना मदत करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. अहिल्या नगर जिल्ह्यामधील नेवासा तालुक्यातील शेतकरी बाबासाहेब सरोदे या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार बोलत होते. योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्ज माफी करू, असे आश्वासन देखील अजित पवार यांनी दिले आहे.



अजित पवार म्हणाले की, वीस हजार कोटींचा भार वीज बिल माफ करून बळीराजाला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून निर्णय राज्य सरकारच्या वतीने घेतला आहे. तर ४५ हजार कोटींचा भार लाडक्या बहिणीच्या निमित्ताने उचललेला आहे. शेतकऱ्यांच्या घरातीलच आमच्या बहिणींना देखील या माध्यमातून मदत होत आहे. वेगवेगळ्या पद्धतीने बळीराजाला मदत करण्याचे काम शासनाच्या वतीने केले जात आहे. मात्र, आत्महत्या करेपर्यंत असे टोकाचे पाऊल कुठल्याही शेतकऱ्याने किंवा बळीराजाने उचलू नये, असे आवाहन अजित पवार यांनी केले.

योग्य वेळेला कर्जमाफी करू असे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या आधी सांगितलेले आहे. अजित पवार यांनी देखील कर्जमाफी करण्याचा निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे. हळूहळू सरकारच्या वतीने त्याची तयारी केली जात असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी देखील म्हटले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याचे राज्य सरकारसमोर मोठे आव्हान आहे.वास्तविक अजित पवार यांनी मे महिन्यात आपण शेतकरी कर्जमाफीचे कोणतेच आश्वासन दिलेले नाही, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे राज्यात चांगलेच वादंग उठले होते. मात्र, त्यानंतर ऑगस्ट महिन्यात योग्य वेळ आली की शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली जाणार असल्याचे म्हणत अजित पवार यांनी प्रकरण सावरण्याचा प्रयत्न केला होता. राज्यातील शेतकऱ्यांकडून कर्ज माफीची मागणी सातत्याने करण्यात येत आहे.

# मोरा बंदरातील गुजराती मच्छीमार बोटीतील एक खलाशी बेपत्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**-गेली ५ ते ६ दिवस रायगड जिल्यातील उरण तालुक्यात व परिसरात जोरदार वादळ वारा व पाऊस सुरु आहे.वादळी वाऱ्यामुळे उरण तालुक्यात असलेल्या मोरा बंदरात आश्रयासाठी आलेल्या गुजराती मच्छीमार बोटीतून एक खलाशी बेपत्ता झाला आहे.भरतभाई डालकी (४४) असे या बेपत्ता खलाशाचे नाव आहे.गुजरात राज्यातील वेरावल येथील भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची भवानी गंगा नावाची मच्छीमार बोट वादळी हवामानाच्या इशाऱ्यानंतर सुरक्षिततेसाठी मोरा बंदरात नांगर टाकून विसावली होती.१९ ऑगस्ट २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोरा बंदरात आलेल्या या मच्छीमार बोटींवर ६ खलाशी व एक तांडेल असे एकूण सात जण होते.पैकी भरतभाई डालकी हा खलाशी शौचालयाला गेला होता.बराच वेळ झाला तरी बोटीवर दिसून आला नसल्याने त्याचा शोध घेतला मात्र कुठेच आढळून आला नाही.त्यामुळे मोरा सागरी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली असल्याची माहिती वपोनि सुर्यकांत कांबळे यांनी दिली. दरम्यान याप्रकरणी पोलिस व सागरी सुरक्षा रक्षक दलाच्या सदस्यांना बेपत्ता खलाशाचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.तसेच गुजराती बोटीवरील खलाशी व तांडेल यांनाही सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे सुचना देण्यात आल्या असल्याची माहिती रायगड मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त संजय पाटील यांनी दिली.वारंवार मासेमारी बोट, प्रवाशी बोटीच्या दुर्घटना होत असल्यामुळे समुद्रातील प्रवास व व्यवहार अधिकच धोक्याचे झाल्याचे चित्र दिसत आहे.

संपादकीय

# अरण्यातले वनऋषी

ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारुती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान-सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे 'चकवाचांदण' असो किंवा 'नवेगाव बांधचे दिवस' असो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले. कर्नाळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक 'पक्षी जाय दिगंतरा.' हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता.

साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात 'रानवाटा' जसे आहे तसेच 'रातवा' आणि कितीतरी आहेत.सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी 'पक्षी कोश' लिहिला तसेच 'वृक्ष कोश' लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे 'पक्षी कोश' त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात. बिब्याच्या झाडाला फुले लागली, तर त्या भागात दुष्काळ पडतो असे त्यांचे निरीक्षण होते. असे अनेक मनोरंजक, निरीक्षण आणि ज्ञान त्यांच्या लेखनात होते. चितमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली. चितमपल्ली यांच्यासारखे लोक आता होणार नाहीत. हा ठेवा आहे. तो काळाने न मागता आपल्याला दिला होता आणि न सांगता नेलाही.

# आपली सायबर सुरक्षा आपल्याच हाती...



कोरोनासारखे संसर्गजन्य आजार जरी धोकादायक असले तरी औषधांनी आणि योग्य उपचारांनी बरेही होऊ शकतात. या उलट सायबर अटॅक असे असतात की, आपण जेवढे थांबवायला बघू तेवढे ते नवनवीन पद्धतीने आणि मार्गांनी वाढतच जातात. बरं त्यांचे लक्ष्य केवळ श्रीमंत उद्योजकच नसतात, तर कोणीही त्यांचे शिकार होतात, कारण आता गरीब असो की श्रीमंत, शहरातला असो की ग्रामीण, सर्वांकडेच इंटरनेट आणि स्मार्ट फोन असतात. अनेकांना टेक्नॉलॉजीचे ज्ञान नसते आणि याचाच फायदा सायबर हल्लेखोर लीलया घेतात.

अलीकडेच काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनासाठी आलेल्या भारतीय नागरिकांवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी क्रूर हल्ला करून २६ निष्पाप नागरिकांचे प्राण घेतले. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर जोरदार रॉकेट हल्ले करत अवघ्या २२ मिनिटांमध्ये ते सर्व तळ बेचिराख केले. हा हल्ला इतका जबरदस्त आणि अचूक होता की, पाकिस्तानला अक्षरशः भारतापुढे गुढघे टेकावे लागले. मात्र युद्धाची सुरुवात होताच पाकिस्तानी सायबर हल्लेखोरांनी भारताच्या प्रमुख वित्तीय संस्था, सरकारी वेबसाइटसवर हल्ले सुरू केले. भारत सरकारच्या एका अधिकृत माहितीनुसार या सायबर हल्लेखोरांनी भारताच्या विविध वेबसाइटरवर ७०० पेक्षा जास्त हल्ले केले. यात त्यांनी भारतातील सर्वसामान्यांना लक्ष्य केले होते. उदा. भारतीय सेनेचा पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला. बघा कसे भारताने अचूक हल्ले करून पाकिस्तानला केले नामोहरम.... हे बघा भारतीय युद्ध विमाने पाडल्याचे पुरावे... असा व्हीडियो लिंक आणि एपीके फाइल्स तयार करून हे हल्ले करण्यात आले. जो कोणी उत्सुकतेने या लिंकवर क्लिक करत असे त्याचे बँक खाते लगेचच हॅक करून त्यातील रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळवली जात असे. इकडे लिंकवर क्लिक केले की अवघ्या काही सेकंदात त्या व्यक्तीचे खाते हॅक करून आर्थिक लुबाडणूक केली जात होती.

अलीकडच्या काळात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मुंबईतील वडाळा येथे राहणारा एक व्यापारी गुजरातमध्ये तीर्थयात्रेला गेला होता. यादरम्यान स्कॅमरने त्यांच्या डीमॅट खात्याशी जोडलेला मोबाइल संपर्क नंबर बदलला आणि त्या व्यापाऱ्याच्या ई मेल खात्याशी मिळता-जुळता बनावट ई मेल तयार केला व त्याच्या खात्यातील तब्बल २० लाख रुपयांचे शेअर्स परस्पर अन्य खात्यात वळवले.

अन्य एका घटनेमध्ये सायबर भामट्याने मुंबईतील एका नामवंत कंपनीच्या ई मेल खात्याशी साधर्म्य असणारे ई मेल खाते तयार केले व या कंपनीशी व्यवहार करणाऱ्या एका महिलेला तिच्या त्या बनावट ई मेलद्वारे संपर्क केला आणि तिला तिच्या बँक खात्यातील ११ लाख रुपये त्याच्या खात्यात जमा करण्यास राजी केले. ते ई मेल खाते कंपनीच्या ई मेल खात्याशी मिळत-जुळत असल्याने त्या महिलेने कोणतीही खातरजमा न करता पैसे सांगितले त्या खात्यात वळवले. काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने मुंबई पोलिसांच्या सायबर शाखेत तक्रार केली. तांत्रिक मदतीच्या आधारे पोलिसांनी त्या सायबर चोराला पकडले व त्या महिलेचे पैसे तिला परत केले. हे सायबर हल्लेखोर आपले सावज हेरण्यासाठी सोशल मीडियाचा मोठ्या खुबीने वापर करतात. विशेष अपडेट, युद्धाशी संबंधित दृष्ये किंवा लिक झालेल्या फुटेजेसचा वापर करून मालवेअर, स्पायवेअर किंवा फिशिंग वेबलाइटसच्या लिंक देऊन सर्वसामान्यांना आकर्षित करतात. हे काम व्हॉटसअॅप आणि टेलिग्रामच्या माध्यमातूनही केले जाते. त्यामुळे सायबर शाखा पोलिसांनी सर्वांसाठी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. व्हॉटसअॅप आणि टेलिग्राम वापरणाऱ्यांनी विश्वासू व्यक्तीने पाठवल्या असल्या तरी अज्ञात व्हीडियो, फोटो अथवा बातम्यांच्या लिंक उघडू नयेत. त्याचप्रमाणे असे संदेश पुढे पाठवूही नयेत. मेसेजिंग अॅपद्वारे पाठवण्यात आलेल्या -झघ फाइल्स आपल्या मोबाइल अथवा संगणकावर इन्स्टॉल करणे टाळावे, विवादित अपडेट किंवा संवेदनाशील फुटेज दाखवण्याचा दावा करणाऱ्या फॉरवर्ड केलेल्या लिंक उघडू नका, ज्ञात व्यक्तींनी पाठवलेले ई मेल उघडू नका, आवश्यक नसलेल्या ई मेलच्या लिंक डाउनलोड करणे टाळा, कोणताही ई मेल उघडताना पत्ता काळजीपूर्वक तपासा, कारण फिशिंग अथवा स्पॅम ई मेल बहुतांशवेळी कायदेशीर संस्थांची हुबेहूब नक्कल करतात. सोशल मीडियावर आलेल्या व्हीडियो लिंकची खात्री नसेल तर ती उघडण्याचा प्रयत्न करू नका.

बाह्य किंवा क्लाउड स्टोरेजचा नियमित बॅकअप घ्या. आपले पासवर्ड कोणासोबत शेअर करू नका. आपली वैयक्तिक माहिती सोशल मीडियावर प्रसारित करू नका. संगणक किंवा मोबइलमध्ये एंटीव्हायरस सॉफ्टवेअर नियमित अपडेट करा. खात्री नसेल असे संदेश सोशल मीडियावर फॉर्वर्ड करू नका. थोडक्यात काय तर आपली सुरक्षा ही पोलिसांची जबाबदारी असली तरी ती तितकीच आपलीही आहे. थोडेसे सावधान-सतर्क राहिले तर आपली लुबाडणूक टाळता येऊ शकते. त्याचप्रमाणे सोशल मीडिया वापरताना थोडी काळजी घेतली आणि वैयक्तिक गुप्तता पाळली तर ते आपल्या आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.

# महेंद्रशेठ घरत यांनी दुसऱ्यांदा पूर्ण केली कैलास मानसरोवर यात्रा!



**उलवे । प्रतिनिधी**

महेंद्रशेठ घरत यांनी यंदा दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केली. १० ऑगस्ट २०२५ ला ते यात्रेसाठी निघाले होते. अतिशय खडतर असणारी कैलास मानसरोवर यात्रा गुरुवारी (ता. २१) त्यांनी पूर्ण केली. हिंदू धर्मात अतिशय पवित्र समजली जाणारी ही यात्रा आहे. ही यात्रा पूर्ण करणाऱ्याला 'कैलाशी' असे संबोधले जाते. ही यात्रा अंतिम यात्रा म्हणून समजली जाते. त्यामुळे यापूर्वी त्यांनी १०१८ मध्ये सपत्निक ही यात्रा पूर्ण केली होती. मात्र 'डोकलाम' विषयावरून २०१८ पासून कैलास मानसरोवर यात्रा बंद होती; परंतु यंदा जूनमध्ये कैलास मानसरोवर यात्रेला परवानगी मिळाल्यानंतर तातडीने ही संधी महेंद्रशेठ घरत यांनी दुसऱ्यांदा साधली.कैलास मानसरोवर यात्रेत तीन दिवसांच्या अतिशय खडतर अशा कैलास परिक्रमेचा समावेश होता. दारचिन येथून पहाटे पाच वाजता त्यांनी प्रवासाला सुरुवात केली आणि यमद्वाराला तीन फेऱ्या मारून कैलास मानसरोवर यात्रेला प्रारंभ केला. त्यानंतर सुंदर नद्या, उंचच उंच बर्फाळ पर्वत, ऊन-पावसाचा खेळ पाहात, रमतगमत पहिल्या दिवसाचा १४ किमीचा प्रवास त्यांनी बर्फातून केला. दक्षिण भागाचे हे दर्शन विलोभनीय होते. देरापूक उत्तरमुखाचे सुंदर दर्शन घेतल्यावर प्रवासाचा ताण कमी झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

गौरीकुंडाचे विहंगम दृश्य डोळ्यांचे पारणे फेडते. नंदीच्या आकाराचे ते पर्वत पाहून स्वर्गसुखाचा अनुभव आला. त्यानंतर दुसरा दिवस २२ किमी खडतर डोंगर आणि बर्फातून त्यांनी प्रवास केला. त्यानंतर धुतूरपूरला मुक्काम करून तिसऱ्या दिवसाची पहाट उजाडली. तेव्हा त्यांनी ६ किमी आणि १८ हजार फुटांपेक्षा जास्त असा बर्फातून प्रवास सुखरूप केला. या प्रवासात अनेकांना उलट्या होणे, चक्कर येणे, गुदमरल्यासारखे होणे हे सर्रास होत होते. तेव्हा आपल्याला आपली औकात काय आहे हे कळते आणि अहंकार गळून पडतो, असे महेंद्रशेठ घरत म्हणतात.

या साऱ्या प्रवासात अतिशय अवघड ट्रेक असल्याने जगभरातून पर्यटक येतात. प्रवासात जागोजागी श्वास घेतानाही त्रास होतो, हाडे गोठवणाऱ्या थंडीचा अनुभव घेतल्यानंतरच खऱ्या अर्थाने कैलास मानसरोवर यात्रा काय आहे, हे त्यांनाही कळते. त्यामुळे पुनर्जन्माचा अनुभव घेऊनच 'कैलासी' घरचा रस्ता धरतात. साधारण ५४ किमीचा कैलास मानसरोवरचा हा महाकठीण प्रवास पर्यटकांना दुसऱ्या जन्माचा अनुभव देतो. डार्चेन ते देरापूक मठ या ट्रेकिंगमध्ये कैलास पर्वताच्या उत्तरेकडील भागाचे नयनरम्य दृश्य दिसते. जे यात्रेकरूंसाठी एक पवित्र आणि विस्मयकारक ठरते.


कैलास परिक्रमेचा सर्वोच्च बिंदू असलेला डोल्मा पास ओलांडताना तर मेंदूला झिणझिण्या येतात. तरीही ट्रेकचा सर्वात कठीण, परंतु आध्यात्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा प्रवास करताना महेंद्रशेठ घरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धीर सोडला नाही. दरम्यान, महारुद्र अभिषेक, जागोजागी आरती करून ते शिवशंकराचरणी लीन झाले होते. गौरी कुंड आणि एक पवित्र तलाव ओलांडून त्यांनी झुथुलपुक मठात प्रवेश केला. झुथुलपुक ते डार्चेन, सागा येथे गाडीने गेले. त्यानंतर डार्चेनला पुन्हा ट्रेकिंग करण्यात आली. त्यामुळे कैलास परिक्रमा पूर्ण केल्याची भावना, तिबेटी लँडस्केप ओलांडून परत येताना सर्व पर्यटकांना कायम राहिली.

याक हा केसाळ प्राणी आहे. मेंढ्या, जंगळी गाढव, हजारो जीव-जंतू, पक्षी,चिमण्या या सुद्धा अतिशय थंड वातावरणात राहतात. हे 'याचि देही याचि डोळा' कैलास मानसरोवर यात्रेनिमित्त पाहता आले, असे महेंद्रशेठ घरत म्हणतात.

'अष्टपद' हे जैन धर्मीयांचे अतिशय महत्त्वपूर्ण तीर्थस्थान आहे. ते कैलास पर्वाताच्या जवळ आहे. जैन धर्मात अष्टपद हे भगवान ऋषभदेवाच्या (आदिनाथ) मोक्षाचे (मुक्ती) स्थान मानले जाते. त्यामुळे जैन धर्मीय बांधव ही महत्त्वपूर्ण यात्रा करण्यासाठी कैलास मानसरोवरला आवर्जून जातात. कारण त्यामुळेच अष्टपदाचे दर्शन होते. महेंद्रशेठ घरत यांनीही हे दर्शन घेतले आणि आपण कैलासी आहोत, हे दाखवून दिले.

त्यामुळेच राजकीय आणि सामाजिक जीवनात सक्रिय असलेल्यांमध्ये कैलास मानसरोवर ही महाकठीण यात्रा दुसऱ्यांदा पूर्ण करणारे महेंद्रशेठ घरत हे एकमेवाद्वितीय असल्याचे मानले जात आहे. त्यांची गणना सध्या 'पर्यटनाचा बादशहा' म्हणून होत आहे. दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केल्याने मनस्वी आनंद झाला आहे. २०१८ मध्ये कैलास मानसरोवर यात्रेसाठी सौभाग्यवती शुभांगी सोबत होती. तो अनुभव विलक्षण होता. कैलास मानसरोवर यात्रा आपल्याला योग्यता दाखवतो. आपण कुठून आलो, कोठे जाणार, आपण सर्व पशू-पक्षी, जनावरे ही एकाच ईश्वराची लेकरे आहोत. त्यामुळे व्यर्थ अभिमान कशाला? त्यामुळेच यंदा सहकाऱ्यांसोबत शिवशंकराचे आभार मानण्यासाठी दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केली. त्यामुळे स्वतःला धन्य झाल्याचे समजतो, अशा भावना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कैलास मानसरोवर यात्रा दुसऱ्यांदा पूर्ण केल्यानंतर व्यक्त केल्या.

# महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन सल्लागार समितीवर बाळासाहेब तुकाराम भुजबळ यांची शासनाकडून नियुक्ती




**उरण । विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने किमान वेतन सल्लागार समिती घोषित केली असून सदर समितीवर कामगार प्रतिनिधी म्हणून बाळासाहेब तुकाराम भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.कामगार क्षेत्रात भारतीय मजदूर संघ माध्यमातून शिरवळ, शिरूर, मावळ, रायगड जिल्ह्यातील संघटित,असंघटित क्षेत्रात बाळासाहेब तुकाराम भुजबळ हे गेली २७ वर्षापासून संघाच्या वतीने काम करीत आहेत. औद्योगिक क्षेत्रातील पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या कंपन्यांमध्ये कामगारांचे वेतनवाढ करार , कामगारांवर होणारे अन्यायाला वाचा फोडण्या करिती आंदोलन त्यांनी केलेले असून पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे, विविध हॉस्पिटल तसेच विविध कॉलेज, व शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आंदोलने केली आहेत. असंघटित क्षेत्रातील हंगामी फवारणी कर्मचारी या संघटनेचे ते प्रदेश अध्यक्ष म्हणून सध्या ते कार्यरत असून भारतीय मजदूर संघाच्या विविध जबाबदारी त्यांनी सांभाळलेल्या असून सध्या ते भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे संघटन मंत्री म्हणून कार्यरत आहेत.

असंघटित क्षेत्रातील तसेच विविध उद्योगात काम करणाऱ्या कायम, कंत्राटी/रोजंदारी अथवा डेली वेजेस वर काम करणाऱ्या लाखो कामगारांचे वेतन निश्चित करण्यासाठी शासनाची किमान वेतन सल्लागार समितीवर काम करणार असून तसेच वीज उद्योगातील, मेट्रो उद्योगातील कामगारांसाठी स्वतंत्र वेतनश्रेणी करिता शोषित पीडीत व वंचित कामगारांना चांगल्या प्रकारे जीवनमान जगता यावे याकरिता त्यांना चांगले किमान वेतन मिळावे यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती बाळासाहेब भुजबळ यांनी दिली. या वेळी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात व सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी व पुणे भारतीय मजदूर संघ अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सचिव सागर पवार यांनी अभिनंदन प्रस्ताव पारित करण्यात येवुन सर्व सामान्य कामगारांपर्यंत किमान वेतनच नाही तर जीवन वेतन मिळवे अशी अपेक्षाच अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केली आहे . शासनाने व भारतीय मजदूर संघाने या मंडळावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल बाळासाहेब भुजबळ यांनी उभयंताचे आभार मानले.

# गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करणार

## सात दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाला परवानगी; मंत्री आशिष शेलार यांची माहिती

**पुणे (वृत्तसंस्था)**–राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा राज्यशासनाने निर्णय घेतला असून सार्वजनिक गणेशोत्सव जागतिक पातळीवर नेण्याकरिता सर्वांनी मिळून काम करावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले. या वर्षीच्या गणेशोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील प्रसंग, ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तूंचा वापर, युनेस्कोच्या वारसा स्थळ यादीतील १२ गडकिल्ले, पर्यावरण आदी विषयावर जनजागृती करण्याकरिता गणेश मंडळांना प्रोत्साहन द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.शेलार म्हणाले, यंदाच्या गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली असून, याबाबत प्रशासनाने गणेश मंडळ, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. प्रसिद्ध गणेश मंडळे, गणेश मंदीराचे भक्तांकरिता थेट प्रक्षेपणाद्वारे घरातूनच दर्शनाची सोय उपलब्ध करुन द्यावी, केंद्रीय राज्य राखीव पोलीस दलाचा बँड शो आणि पोलीस दलांचा बँड शो तसेच डॉग शोचे आयोजन करावे. शाळा, महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनांचे विद्यार्थी, सामाजिक संस्थांना सहभागी करुन उपक्रमाचे आयोजन करावे. महावितरणने गणेश मंडळांना वीज उपलब्ध करुन द्यावी. आरती करणाऱ्या भजनी मंडळाना मोफत साहित्य वाटप करण्यात येणार असून याबाबतच्या संकेतस्थळाचे उद्या लोकार्पण करण्यात येणार आहे, याचा मंडळांना लाभ देण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी. गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून शासकीय आस्थापनांच्या इमारती, वारसास्थळांवर या बोधचिन्हाची रोषणाई करण्यासोबत महत्त्वाच्या चौकाचे सुशोभीकरण करुन रोषणाई करावी. विसर्जनाबाबत निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. विसर्जन मार्गावर ड्रोन शोचे आयोजन, जाहिरात फलकांवर सामाजिक संदेश देण्याची कार्यवाही करावी. विदेशी विद्यार्थी, नागरिक, विदेश दूतावासातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे. भारतीय हवामान विभागाकडून पावसाबाबत देण्यात येणाऱ्या अंदाजानुसार प्रशासनाने तयारी करावी.



# हवामान विभागाचा इशारा: पुढील २४ तासांत महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांमध्ये वादळाचा अंदाज

### पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हलका तर विदर्भात वादळाची शक्यता



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याच्या अनेक भागात पावसाची तीव्रता कमी झाली असली तरी, कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर विदर्भात वादळाची शक्यता आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी सावध राहण्याचा आणि स्थानिक सूचनांचे पालन करण्याचा सल्ला प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात मागील दिवसांच्या तुलनेत पावसाची तीव्रता कमी झाली आहे.

मुंबईत मुसळधार पावसानंतर दिलासादायक बातमी आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकला आहे आणि अरबी समुद्रात तयार झालेले चक्रीवादळ गुजरातकडे वळत आहे. अशा परिस्थितीत, पुढील काही दिवस महाराष्ट्रात कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे मुंबई, पुणे, मराठवाडा आणि विदर्भ येथील सामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. राज्यभरात अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले. अनेक ठिकाणी घरे कोसळली आणि अनेक ठिकाणी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे शाळांनाही सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या होत्या.

### मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनपूर्वी सरकारचा मोठा निर्णय

# मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्ष पदी राधाकृष्ण विखे पाटलांची निवड

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मनोज जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्टच्या मुंबईतील आंदोलनापूर्वी, महाराष्ट्र सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारने मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदी राधाकृष्ण विखे पाटील यांची निवड केली आहे. यापूर्वी या उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील होते.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील ही उपसमिती मराठा समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा नियमितपणे आढावा घेणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने उपसमितीचे हे पुनर्गठन केले आहे.मराठा आरक्षण उपसमितीमार्फत मराठा आरक्षणाशी संबंधित प्रशासकीय आणि कायदेशीर कामकाजाचा समन्वय राखला जाणार आहे. या समितीकडून न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये



शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी नेमलेल्या वकिलांशी समन्वय साधला जाईल आणि त्यांना आवश्यक सूचना दिल्या जातील. तसेच, न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धती देखील ही उपसमिती ठरवेल.

या उपसमितीची काही प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे आहेत:

न्या. संदीप शिंदे यांच्या समितीसोबत समन्वय साधणे.

मराठा आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करणे.

जात प्रमाणपत्र देण्यामधील अडचणी दूर करून प्रक्रिया सुरळीत करणे.

'सारथी' आणि 'अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ' यांसारख्या संस्थांमार्फत मराठा समाजासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

# कोकणवासीय गणेशभक्तांसाठी विशेष सोयीसुविधा आणि जादा रेल्वे गाड्या

### रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे खासदार श्रीकांत शिंदे व नरेश म्हस्के यांनी मानले आभार

**ठाणे । प्रतिनिधी**

कोकणात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवासाठी रेल्वे प्रशासनाने जादा गाड्या सोडाव्यात यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के आणि कोकणातील महायुतीच्या सर्व खासदारांनीरेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेटघेतली होती.सातत्याने केलेल्या मागणीचा रेल्वेने योग्य विचार करत जादा रेल्वे गाड्या आणि विशेष सोयीसुविधा दिल्याबद्दलखासदार डॉ. श्रीकांत शिंदेवखासदार नरेश म्हस्के यांनी सर्व खासदारांच्या वतीने रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे विशेष आभार मानले आहेत.यावर्षी कोकण रेल्वेने मध्य, पश्चिम आणि दक्षिण रेल्वेसोबत समन्वय साधून तब्बल ३६६ विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुंबई, पनवेल, वडोदरा, बेंगळुरू, रत्नागिरी, कुडाळ, सावंतवाडी, मडगाव या ठिकाणांवरून



चाकरमान्यांना गावी जाणं अधिक सोपं आणि सोयीचं होणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय सोयीसुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. २५ ऑगस्टपासून खेड, माणगाव, चिपळूण, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी रोड येथे पॅरा–मेडिकल कर्मचारी तैनात केले जातील. चिपळूण आणि रत्नागिरी येथील आरोग्य केंद्रांमध्ये २४ तास डॉक्टर, परिचारिका व बहुउद्देशीय कर्मचारी उपलब्ध राहतील आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका सज्ज असतील, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी स्थानकांवर खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, विशेष तिकिट रांगा, प्री–प्रिंटेड तिकिटांची सोय, यात्री सहायता केंद्रे, राज्य परिवहन बस याची व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दीचे नियोजन करण्यासाठी विशेष तपासणी, सीसीटीव्ही निगराणी, ठझ्रऋ व स्थानिक पोलिसांचा समन्वय यामुळे प्रवास अधिक सुरक्षित झाला आहे. त्याचबरोबर स्थानकांची स्वच्छता व आकर्षक सजावट यासाठीही प्रशासनाने योग्य पावले उचलली आहेत. गणेशोत्सवाचा आनंद प्रवासातही अनुभवता यावा म्हणून स्थानकांवर रांगोळ्या, विशेष प्रकाशयोजना, पूजा साहित्य व मिठाईचे स्टॉल्स, संगीत–कलासादरीकरण आणि सेल्फी पॉइंट्स तयार करण्यात आले आहेत.सातत्याने गणेश भक्तांकरता आणि सर्व खासदार ज्या मागण्या करत होते, त्या आमच्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून रेल्वे प्रशासनाने या योजना राबवल्याबद्दलखासदार डॉ. श्रीकांत शिंदेवखासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे विशेष आभार मानले आहेत.

# मनसेचे मुंबईतील खड्ड्यांविरोधात आंदोलन:त्यांच्याकडे कोणतेही काम राहिलेले नाही–मंगलप्रभात लोढा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पावसामुळे रस्त्यांची मोठी दुर्दशा झाली आहे. एका बाजूला खड्ड्यांमुळे टोल आकारला जाऊ शकत नाही, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले आहे. तर दुसरीकडे, या मुद्द्यावर आंदोलन करणाऱ्यांना उद्देशून मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी 'त्यांच्याकडे कोणतेही काम राहिलेले नाही' असे वक्तव्य केले आहे. मुंबई महानगरपालिकेने रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरू केले असून गणपतीपूर्वी हे काम पूर्ण होईल, असे आश्वासनही लोढा यांनी दिले आहे.

मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जे लोक खड्ड्यांवरून आंदोलन करतात. त्यांच्याकडे कोणतही काम राहिलेले नाही. मग करायचे काय म्हणून ते आंदोलन करत आहेत. जिथे पॅचवर्क निघाले असेल तिथे देखील दुरुस्ती केली जाईल. गणपतीपूर्वी सगळे खड्डे बुजवले जातील, असे लोढा यांनी म्हटले आहे.मुंबईतील रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात मनसे पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. आज, मनसेने चांदिवली येथील एनएसएस रोडवर खड्ड्यांमध्ये उभे राहून आंदोलन केले. यावेळी, खड्ड्यांमुळे जखमी झालेल्या नागरिकांचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करण्यासाठी काही जखमी कार्यकर्त्यांना खड्ड्यात उभे करण्यात आले होते. मनसे कार्यकर्त्यांनी पालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मनसेचे विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांनी यापुढे जिथे जिथे खड्डे असतील, तिथे तिथे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.मनसे प्रमुख राज ठाकरे रस्त्यांच्या दुर्दशेवर टीका करताना म्हणाले, रस्ते बांधकामाचे टेंडर काढा, रस्ता बनवा, तो खराब झाला की पुन्हा टेंडर काढा, हा नवा धंदा सुरू झाला आहे. शिवतीर्थवर गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी रस्त्यांवरून जोरदार टीका केली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत मुंबई शहर नियोजनाचा लघुआराखडा सादर करत चर्चा केली. गेल्या काही महिन्यांपासून ते मुख्यमंत्र्यांशी शहर नियोजनासह विविध विषयांवर संवाद साधत आहेत. मुसळधार पावसामुळे पाणी साचणे, रस्त्यांवरील खड्डे, वाहतुकीतील अडचणी, अनधिकृत पार्किंग यांसारखे गंभीर मुद्दे असले तरी, या भेटीत वाहतुकीसंदर्भात विशेष चर्चा झाली. प्रेझेंटेशनवेळी वाहतुकीसंदर्भातील पोलिस आयुक्तही उपस्थित होते.

# गणपतीसाठी आपल्या गावी जाण्यासाठी कोकणवासीयांचा एसटीला प्रतिसाद–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

येत्या २७ ऑगस्ट रोजी श्री गणरायाचे आगमन होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी मुंबई, ठाणे व पालघर विभागातून कोकणात आपल्या गावी जाणाऱ्या कोकणवासीयांची पहिली पसंती एसटीला दिली आहे. त्यामुळे एसटीच्या ४४७९ बसेस गट आरक्षणासह एकूण ५१०३ जादा बसेस आतापर्यंत फुल्ल झालेले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मुंबईतील कोणवासीयांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा २३ ऑगस्ट ते ०७ सप्टेंबर दरम्यान ५२०० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जात आहे. २३



ऑगस्ट पासून मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

गणपती बाप्पा , मुंबईचे कोकणवासीय व एसटी यांचे एक अतुट नाते आहे. मुंबईतुन कोकणात थेट आपल्या गावी अगदी वाडी–वस्ती पर्यंत फक्त एसटीच कोकणवासीयांना सुखरूप पोहोचवते. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सरवासाठी कोकणात जाणाऱ्या मुंबईकर कोकणवासीयांच्या सेवेसाठी एसटी धावत असते. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.अर्थात,गणेश भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून, २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या काळात एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रवाशांना नैसर्गिक विधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधानगृह उभारण्यात येणार आहेत. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. तसेच सर्व गणेशभक्त प्रवाशांचा प्रवास सुखकर होवो! अशा शुभेच्छा प्रताप सरनाईक यांनी याप्रसंगी दिल्या आहेत.

### सरकारी नोकरदारांसाठी खुशखबर!

# यंदा ५ दिवस आधीच होणार खात्यात पगार जमा,गणेशोत्सवानिमित्त राज्य शासनाचा निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्त वेतनधारकांसाठी सरकारने आनंदाची बातमी दिली आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑगस्ट महिन्याचा पगार पाच दिवस आधीच देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १ सप्टेंबरला येणारा नियमित पगार २६ ऑगस्ट रोजी संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवात अतिरिक्त खर्चाचा भार न पडावा आणि सण साजरा करताना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. याचा लाभ जिल्हा परिषद कर्मचारी, मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांचे कर्मचारी, कृषी व अकृषी विद्यापीठांमधील अधिकारी, अशासकीय



महाविद्यालये, तसेच निवृत्त वेतनधारक व कुटुंब निवृत्त वेतनधारक यांनाही मिळणार आहे.दरम्यान, गणेशोत्सवाच्या शेवटच्या पाच दिवसांमध्ये गणेश मंडळांना रात्री १२ वाजेपर्यंत देखावे सादर करण्याची मुभा दिली जाणार आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी कराड येथे ही माहिती दिली असून, यासंदर्भातील अधिकृत आदेश लवकरच मुख्यमंत्री जाहीर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कल्याण डोंबिवलीतील ३ नगरसेविकांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश

**ठाणे । प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत आज कल्याण डोंबिवली महापालिकेतील तीन माजी नगरसेविकांनी आज शिवसेनेते प्रवेश केला. कल्याण ग्रामीणचे तालुका प्रमुख मुकेश पाटील, तालुका प्रमुख प्रकाश म्हात्रे, उबाठाच्या माजी नगरसेविका प्रेमा म्हात्रे आणि माजी नगरसेविका प्रमिला पाटील, संघर्ष समितीच्या माजी नगरसेविका शैलजा भोईर, कोळेगावचे सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे लालचंद भोईर, सरपंच सुनील भोईर, गुरुनाथ जाधव यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. ठाण्यात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यात आमदार राजेश मोरे, शिवसेना सचिव राम रेपाळे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की मागील अनेक वर्षांपासून शिवसेनेचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी कौटुंबिक नाते प्रत्येकजण जपत होता. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात हे पदाधिकारी काम करतात. आज वारकरी संप्रदायाचे देखील लोक आज शिवसेनेत सहभागी झाले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आज सखाराम पाटील, गजानन मांगरुळकर, संजय गायकर, धारीवलीचे उपसरपंच रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य समीर पाटील, गौरव ठाकूर, छाया काळे, वारकरी सांप्रदाय अध्यक्ष सुरेश ठाकरे, उपसरपंच चंद्रकांत ठाकूर, विश्वनाथ रसाळ, हेदुटणेचे सरपंच रामदास काळण, हरिश्चंद्र मांगरुळकर यांनी शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला.

# निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे परळीतील प्रभाग रचना करा-बालाजी जगतकर

## शहरातील अनेक वस्त्यांचे विभाजन करून जुनी प्रभाग रचना

## नवीन प्रभाग रचना करण्यासाठी नगर परिषदेतकडे आक्षेप, हरकती नोंदवा

**बीड । प्रतिनिधी**

परळी शहरातील सर्वच मागासवर्गीय वस्त्यांची विभाजन करून जुनी प्रभावी रचना केली आहे. ती बदलून नवीन प्रभाग रचना करा त्यामध्ये प्रामुख्याने भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, रोडे गल्ली ताटे गल्ली आरोग्य गल्ली, रमानगर, या वस्ती आहे अनुसूचित जातीच्या आहेत. त्या भागाचे विभाजन टाळून अनुसूचित जातीच्या प्रभागात समावेश करावा यासाठी जवळपास १०० पेक्षा जास्त मतदारांनी व या भागात राहणाऱ्या लोकांनी हरकती, आक्षेप नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे नोंद करायला सुरुवात केली आहे. व आक्षेपी व हरकती नोंद सुरूच आहेत ३१ ऑगस्ट पर्यंत त्या नोंदवल्या जाणार आहेत.

या अगोदर देखील दि. १९/६/२०२५ या तारखेला निवेदन दिलेली आहे. अनुसूचित जाती या समाजाचा असल्यामुळे दलित वस्ती व इतर योजनेपासून वंचित ठेवत आहात प्रभाग क्रमांक पाच (५) गणेशपार, कालरात्री देवी मंदिर परिसर, यात आपण जगतकर गल्ली, गणेश पारपरिसर, काळाराम मंदिर परिसर, व आंबेवेस या प्रभागात अनुसूचितजाती लोकसंख्या ६५७, अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०६, व प्रभाग क्रमांक १६ या प्रभागात आपण अनुसूचित जाती लोकसंख्या ५७७, अनुसूचित जमाती ७६ लोखसंख्या आहे. या दोन प्रभागाची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकत्र केल्यास १२०० आहे तेव्हा या निवेदनावर माझा असा आरोप आहे की आपण प्रभाग क्रमांक ५. प्रभाग क्रमांक ६ या दोन्ही प्रभागाचे मते विभागून आपण कोणा तरी राजकीय पक्षाला मदत करत आहात. आपणास पुनश्च विनंती आहे की निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे म्हणजे वार्डाची लोकसंख्या ही अध्यांपेक्षा जास्त अनुसूचित जातीची असावी, व ५.५.३ प्रभाग रचना मार्गदर्शन तत्त्व ५.५.३ व अनुसूचित जाती ऑब्लिक अनुसूचित जमाती यांच्या वस्तीचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी मुंबई यांनी दिलेले असतानाही परळी नगरपालिका प्रशासन, परळी निवडणूक अधिकारी व प्रस्थापित राजकीय नेते आमदार, खासदार यांच्या सांगण्यावरून त्यांचे त्यांच्या सोयीप्रमाणे प्रभाग रचना करत आहेत व केली आहे. यामुळे राजकीय अन्याय तर होतच आहे पण आमच्या अधिकाऱ्यापासून आम्हास वंचित ठेवत आहात. नगरपालिका प्रशासन व प्रस्थापित राजकीय नेते यांनी संगणमत करून जाणीवपूर्वक अशी प्रभाग रचना केली आहे. अनुसूचित जातीच्या वाडांचे विभाजन प्रभाग क्रमांक ०४ प्रभाग क्रमांक ०५ प्रभाग क्रमांक १६ यातील प्रभाग रचनेत केलेले आहे. तेव्हा सदरील प्रभाग रचना पुन्हा करून अनुसूचित जाती व जमातीचा प्रभाग एक करावा अन्यथा आपल्या विरोधात आम्हाला कायदेशीर व सनदशीर मागने न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत. न्याय न मिळाल्यास कायदेशीर लढाई देखील लढली जाणार आहे.



# कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय याचे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**केज । रणधिर ठोके**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिवद्वारा आयोजित दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी श्री व्यंकटेश महाजन कॉलेज धाराशिव येथे जिल्हास्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा पार पडल्या.त्यामध्ये कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशीच्या कनिष्ठ विभागातील १९ वर्षाखालील मुली व मुले यांनी क्लीन अँड जर्क व स्न्याच मध्ये यश संपादन केले.त्यामध्ये ४८ केजी वजन गटात कु.धनश्री गायकवाड यांनी द्वितीय क्रमांक ५८ के जी वजन गटात कु. शदीक्षा झोरे द्वितीय क्रमांक ६९ केजी वजन गटात कु.राजनंदिनी चव्हाण द्वितीय कु. श्रुती सावंत तृतीय क्रमांक ७७ केजी, समीक्षा वाघमारे प्रथम तर कु.मानसी यादव हिने तृतीय क्रमांक मिळवला ८६ केजी गटामध्ये कु.प्रतीक्षा वाघमारे यांनी प्रथम क्रमांक तर कु.प्रतीक्षा गायकवाड द्वितीय क्रमांक मुलांमध्ये ७१ केजी गटात साद मुजावर यांनी प्रथम क्रमांक मिळवला. ६० केजी वजन गटात हर्षल चेडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व विजयी खेळाडूंचे प्राचार्य डॉ.अशोक कदम सर यांनी कौतुक केले तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळा चे सचिव पी.टी.पाटील साहेब खजिनदार जयकुमार शितोळे साहेब यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक श्री.शशीकांत सरवदे सर यांनी केले. प्राचार्य डॉ.ए.बी कदम सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.व आभार श्री.अजित तिकटे सर यांनी मानले.तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हर हर महादेव..चाहूर चाहूर चांगभलं घोषणांनी कृषीकुल परिसर दुमदुमला

## पारंपारिक पद्धतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा

**सिरसाळ । प्रतिनिधी**



जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनात स्थापन करण्यात आलेल्या कृषीकूल येथे बैलपोळा सण अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने सर्जा राजाला सजवण्यात आले होते. कृषीकूल परिसरातील कृषी महादेव मंदिर येथे मिरवणूक काढून त्यांना दर्शनासाठी आणण्यात आले व तद्नंतर विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य भरवण्यात आला. उपस्थित सर्व कृषीकूल परिवारातील सदस्यांनी हर हर महादेव.... चाहूर चाहूर चांगभला... पाऊस आला चला घराला... आदी घोषणांचा गजर केल्याने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाबद्दल ऋण व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा सण. सिरसाळा जवळच असलेल्या कृषीकुल येथे बैलपोळा हा सण मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यंदा चांगले पर्जन्यमान राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कृषीकुल मधील गोशाळेत असलेल्या बैलांसह इतर गायी, वासरे यांना नवी वेसण, घुंगरमाळा, पैंजण, म्होरकी, घाटी, झूल व गोंडे असे विविध प्रकारचे साहित्याने सजवण्यात आले होते. कृषीकूल परिवारातील सर्व सदस्यांनी या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

# शरद पवार यांच्या विचारांवर विश्वास ठेवून पक्षाप्रती निष्ठावान असलेल्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार-शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या विचारांवर विश्वास ठेवून पक्षाप्रती निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी मिळणार असे प्रतिपादन

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रातांध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी मुलुंड येथे काढले. शिंदे राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष झाल्याबद्दल त्यांचा सत्कार मुलुंड तालुका महिला अध्यक्ष संगिता भरत वाजे यांनी आयोजित केला त्यामध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शिंदे बोलत होते.या सत्कार समारंभ साठी मुलुंड मधील महा विकास आघाडीचे सर्व नेतेमंडळी उपस्थित होते. यामध्ये चरणसिंग संप्रा (काँग्रेस - आय), मा. रमेश कोरगांवकर (शिवसेना -उबाठा),राखीदिदी जाधव (अध्यक्ष, मुंबई राष्ट्रवादी ) ड. अमोल मातेले, अजय समगिर, कुमारी राजोल संजय पाटील तसेच मुलुंड विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

मराठी भाषेमध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमासाठी मराठा मंडळ, मुलुंड यांचे विशेष सहकार्य लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबई प्रवक्ता - सरचिटणीस गणेश (अण्णा) मुळेपाटील यांनी केले.

# दिव्यात वृद्धाश्रमात अन्नदान करून वाढदिवस केला साजरा

## राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष बिपीन दुबे यांचा उपक्रम



**ठाणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष बिपीन कुमार दुबे यांनी वृद्धाश्रमात अन्नदान करून आपला वाढदिवस साजरा केला. प्रसंगी दिवा येथे सुंदरकांड पाठ आणि हनुमान चालीसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते या धार्मिक विधीच्या निमित्ताने मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. दुबे यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. बुधवारी दिवा पूर्व नरहरी समाज सभागृहात भजन गायक विजय (नाना) मिश्रा यांच्या टीमने सुंदरकांड पाठ आणि हनुमान चालीसा पाठ केले. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीने भरून गेला होता. त्याच वेळी सकाळी राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि अधिवक्ता बिपिन कुमार दुबे त्यांच्या टीमसह दिवा येथील साबे गावातील अपना घर वृद्धाश्रमात पोहोचले आणि तेथील वृद्धांना स्वतःच्या हातांनी जेवण दिले. आश्रमातील वडीलधारी मंडळी दुबे यांच्या सेवाभावाने भारावून गेली आणि त्यांनी विपिन दुबे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त आशीर्वाद दिले त्यांना जीवनात गरीब आणि वृद्धांची अशी सेवा करून उदात्त आणि पवित्र कार्य करण्याची शिकवण दिली. नरहरी समाज सभागृहात आयोजित वाढदिवसाच्या कार्यक्रमानिमित्त, दुबे यांच्या चाहत्यांनी त्यांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अधिवक्ता विपिन कुमार दुबे म्हणतात की मानवतेची सेवा करणे म्हणजे देवाची सेवा करणे. ही सेवा केल्याने एक वेगळाच आनंद मिळतो असे ते म्हणाले. मी खूप भाग्यवान आहे की मला अशी सेवा करण्याची संधी मिळाली आहे. भविष्यात मी जे काही करू शकेन मी अशाच प्रकारे लोकांची सेवा करण्यास तयार राहील अशा परिस्थितीत आपण सर्वांनी पुढाकार घेऊन पुढे आले पाहिजे. जर आपण समाजासाठी काही करू शकलो तर ते आपल्या सर्वांचे सौभाग्य असेल. असे सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मला पालकांकडून वारसाने मिळाली आहे. प्रसंगी कार्यक्रमात आलेल्या सर्व लोकांचे वकील दुबे यांनी आभार मानले.

# नवीन पनवेल, कामोठे परिसरात रस्त्यांमध्ये खड्ड्यांच साम्राज्य

## नागरिक त्रस्त, ठेकेदाराकडून पुन्हा करून घेणार रस्ते

**पनवेल । प्रतिनिधी**

नवीन पनवेल, कामोठे परिसरातील बहुतांशी रस्ते हे मे महिन्याच्या अखेरीस डांबरीकरण करून चकचकीत बनवले होते. परंतु पावसात रस्त्याची पूर्ती वाट लागली असून बहुतांशी रस्त्यांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे .निकृष्ट दर्जाचे रस्ते बनवल्याचा आरोप नागरिकाकडून केला जात आहे. नवीन पनवेल परिसरातील काही रस्ते महानगर गॅस लिमिटेड कंपनीने गॅस वाहिनी टाकण्यासाठी खोदलेल्या खोदकामामुळे रस्ते पावसाळ्यापूर्वी घाईघाईत बनवले आहेत.संबंधित ठेकेदाराकडून पावसाळा संपल्यानंतर पुन्हा नव्याने तेच रस्ते करून घेणार असल्याचे संबंधित पालिका अधिकारी सुधीर साळुंखे यांनी सांगितले आहे. नविन पनवेल, कामोठे परिसरात महापालिकाच्या भोंगळ कारभाराचा फटका कर दात्या नागरिकांना सोसावा लागत आहे. कामोठे वसाहतीतील मुख्य रस्ता वाहून गेला आहे तर नवीन पनवेल परिसरातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने दिवसेंदिवस अपघातांमध्ये वाढ होण्याचे प्रमाण वाढले आहे. मुसळधार पावसानंतर दोन दिवसांपूर्वी रस्त्यावरील खड्डे ठेकेदाराने बुजविण्यात आले . मात्र निकृष्ट कामामुळे रस्त्यावर पुन्हा खड्डे पडलेले दिसत आहे.या खड्यामुळे नागरिकांसह वाहनचालक त्रस्त झाले आहे.नविन पनवेल रेल्वे स्थानक समोरील रस्ते, सेक्टर १,१२,१३, येथील रस्ते तसेच सिकेटी शाळेच्या समोर पोदी मार्गावर रस्ते या परिसरात सततच्या वाहनांची वर्दळ होत असल्याने येथील रस्त्यांवरील खडी खड्डयातून बाहेर येते. 'खड्डे जैथे थे' अशी परिस्थिती निमार्ण होत आहे. दुचाकीस्वारासाठी ही खडी अपघाताला आमंत्रण ठरत आहे. तर पादचाऱ्यांनाही या खडीचा धोका संभोवतो. खडी टाकून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न पालिका अधिकारी व ठेकेदार कडून होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पुन्हा पडलेल्या खड्डयांबाबत येथिल नागरिक संतप्त झाले आहेत. रस्ते तयार होत असताना पालिका अधिकारी रस्त्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या मटेरियल ची पाहणी करतात की नाही अशी शंका नवीन पनवेलकर उपस्थित करत आहेत. करदात्यातून करोडो रुपयांची उधळण रस्त्यावर होत असते. तरी नवीन पनवेल करांच्या माथी निकृष्ट दर्जाचे रस्ते मारले जात असल्याच्या संतप्त भावना येथील नागरिक व्यक्त करीत आहेत .ज्या ठेकेदाराने नवीन पनवेल मधील रस्ते बनवले आहेत त्या संबंधित ठेकेदाराकडून पुन्हा कोणत्याही पैसे न देता तेच रस्ते डांबरीकरण करून घेण्यात येणार असल्याचे संबंधित पालिका अधिकारी सुधीर साळुंखे यांनी पुढारीशी बोलताना सांगितले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077